International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
September 2014
Issue-III, Volume-II
Online Journal
ISSN No. 2347-8268

# ग्रंथालय सेवेत सोशल नेटवर्कींग चा उपयोग

**चंद्रमणी कैलाश गजभिये**
**ग्रंथपाल**
मनोहरभाई पटेल महाविद्यालय देवरी, आमगाव रोड, देवरी, जिल्हा गोंदिया - ४४१९०१
gchandra075@gmail.com, **Mob. No.** 09403593809

**सार**

प्रस्तुत शोध पेपर मध्ये, सोशल नेटवर्कींग चा ग्रंथालयाकरिता नवीन तंत्रज्ञान म्हणून उपयोग करण्यात येतो. वाचकांना आणि उपयोगकर्त्याला ग्रंथालयामध्ये आणि बाहेर शुध्दा सेवा पूरविण्याकरिता यांचा प्रभाविपणे वापर केला जातो. याकरिता सोशल नेटवर्कींगवर खाते खोलने आवश्यक आहे. यावरुन ग्रंथालयामधून विशिष्ट सेवा देता येते. या पेपर मध्ये फेसबुक या सामाजिक नेटवर्कींगवर जास्त भर दिला आहे.

**कीवर्ड** – सोशल नेटवर्कींग आणि ग्रंथालय सेवा

## प्रस्तावना

माहिती तंत्रज्ञान युगामध्ये आज सोशल नेटवर्कींगने क्रांती केलेली दिसून येते. जवळपास २०५ सोशल नेटवर्कींगचा विकास सर्वात जास्त आणि उपयोगी बनत आहे. प्रत्येक सामाजिक नेटवर्कींगचा उपयोग जशा करावा तसा करता येतो. सर्वात जास्त उपयोगात येत असलेल्या फेसबुक या सामाजिक नेटवर्कींचा उपयोग करतांना दिसत आहे. अनेक उपयोगकर्ते सामाजिक नेटवर्कींगशी जुळलेले दिसून येतात. सामाजिक आणि मनोरंजनात्मक माहिती पुन्हा-पुन्हा प्राप्त करण्यासाठी आणि त्या संदर्भातील वातावरण निर्माण करण्याकरिता अशा सामाजिक नेटवर्कींगचा उपयोग केला जातो. नेटवर्कींग वेबसाईट मध्ये सर्वसामान्यपणे उपयोगकर्ता याला एक प्राफाईल तयार करावी लागते. या प्रोफाईल च्या माध्यमातून नेटवर्क वर एक समूह तयार करुण त्यांना आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करणे आणि मागविता शुध्दा येऊ शकते अशा विविध प्रकारच्या सेवा ग्रंथालयामधून देता येतात. सर्वात लोकप्रिय सोशल नेटवर्कींग फ्लिकर, फेसबुक, लिंकेदिन, टिवटर, ब्लॉग्स, युटयुब इत्यादि आहेत. याद्वारे विद्यार्थी, शंसोधक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर आणि सर्व सामान्य नागरीक हे सामाजिक चळवळीसाठी याचा प्रयोग करु शकतात

## उद्देश

१. ग्रंथालयामधुन सामाजिक नेटवर्कीग च्या साइट ची ओळख आणि उपलब्धता करणे.

२. ग्रंथलयासाठी सामाजिक नेटवर्कीग साइट ची उपयोगीता कशी याची ओळख करणे

३. विद्यार्थ्यांना सामाजिक नेटवर्कीग चा उपयोग कशा करावा आणि आपल्या शिक्षणामध्ये उपयोग करावा.



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

४. विद्यार्थ्यांनकडून सामाजिक नेटवर्कींग वर आपले विचार मागणे आणि उपलब्ध करणे

**सामाजिक नेटवर्कींग चा उपयोग**

ग्रंथालय आणि अन्य व्यावसायीक संगठन याचा उपयोग करीत आहे.

१. या नेटवर्कींगच्या मंचावरुण माहिती आणि संवाद उपयोगकर्ता तसेच ग्राहकांपर्यंत पोहोचता येते.

२. या नेटवर्कींगमुळे अभ्यासाकरिता एक खेळाचे मैदानच झालेले आपल्याला दिसून येते.

३. वाचकाला आणि उपयोगकर्त्याला आपल्या अभ्यासासंबंधित वेगवेगळया विषयावंर संवाद साधता येते.

४. वाचकांसाठी या मंचाचा उपयोग प्रभावीपणे करता येतो.

५. वाचकांला आश्यक माहिती पुरविता येते.

अशाचप्रकारे अनेक सेवा उपयोगकर्त्यांला देता येतात.

**सामाजिक नेटवर्कींग साईट**

सामाजिक नेटवर्कींग जवळपास २०५ आहेत त्यापैकी काही खालील चित्रामध्ये दिलेल्या आहेत.




**ग्रंथालयातून फेसबूक द्वारा सेवा**




वरीलप्रमाणे महाविद्यालयाचे ग्रंथालयाचे पेज तयार करता येते. या पेज ला फक्त लाइक करावयाचे आहे. त्यामुळे उपयोगकर्त्याला ग्रंथालयाशी संपर्क करता येते. उपयोगकर्ता ज्या ठिकाणी आहे त्यांच जागेवर त्याला याचा उपयोग करता येते आणि आवश्यक असणारी माहिती पुरविता येते.




या पेजवर भेट दिल्यानंतर याला LIKE करावयाचे आहे.

International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
September 2014
Issue-III, Volume-II
Online Journal
ISSN No. 2347-8268




माहिती DOWNLOAD सुध्दा करता येते.

## सोशल नेटवर्कींगचे फायदे

ग्रंथपाल आणि उपयोगत्यांकरिता उपयोगी असलेले फायदे खालीलप्रमाणे

१. सोशल नेटवर्कींग च्या सहकार्याने सेवा आणि सुविधा प्रभावीणे वाढविण्यास मदत होते.

२. ग्रंथालय आणि उपयोगकर्त्यांमध्ये माहिती संप्रेषण करण्यास मदत होते.

३. याचा उपयोग सर्च इंजिन आणि ग्रंथालयाच्या बाहेर राहून सुध्दा माहिती उपलब्ध करुण देता येते.

४. ग्रंथपालाचा मुख्य उद्देश ग्रंथालयातील संसाधन वाचकापर्यंत उपलब्ध करुण देण्याकरिता. इत्यादि.

## निष्कर्ष

ग्रंथालयामध्ये संगणकाचा उपयोग केला जात आहे. प्रत्येक ग्रंथालय जवळपास इंटरनेटशी जुळलेले दिसून येते आणि उपयोगकर्ता सुध्दा. माहिती तंत्रज्ञान युगामध्ये ग्रंथालयाचा सर्वात जास्त उपयोग होण्याकरिता सामाजिक नेटवर्क साईट चा उपयोग करता येते. उपयोगकर्त्यांचे ग्रंथालयाप्रती आकर्षन वाढेल. यावरुण उपयोगकर्त्यांला आवश्यक माहिती पाठविता येते, संवाद साधता येते, इत्यादी सेवा पुरविता येतात. सामाजिक नेटवर्कचा योग्य वापर केला तर त्यांचा प्रभाव समाजावर पडतो.

## संदर्भ

१. गजभिये चंद्रमणी, २०१२, माहिती तंत्रज्ञान युगात: शैक्षणिक ग्रंथालयासाठी सेवा, युजीसी राज्य स्तरीय ग्रंथालय चर्चासत्र, समर्थ महाविद्यालय लाखनी, जि. भंडारा (१ ऑक्टोबर २०१२).